27 NOV 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा सुवर्णमहोत्सव

## विद्यापीठात शनिवारी विविध उपक्रम; यशवंतराव चव्हाणांच्या हस्ते झाले होते अनावरण

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवाजी विद्यापीठातील पूर्णाकृती अश्वारूढ पुतळा देशातील एक अत्यंत देखणी शिल्पाकृती आहे. गेल्या पन्नास वर्षांपासून हा पुतळा विद्यापीठात दिमाखात उभा आहे. या पुतळ्याचा प्रतिष्ठापना सुवर्णमहोत्सव दिनाचा सोहळा शनिवारी (ता. ३०) साजरा होणार आहे. यानिमित्त विद्यापीठात पोवाडा, पुतळ्याविषयी माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे प्रकाशन यासह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा लक्ष वेधणारा प्रेरणादायी अश्वारूढ पुतळा.

विद्यापीठात छत्रपती शिवरायांचा पुतळा उभारण्यासाठी देशातील प्रख्यात शिल्पकारांनी पुतळ्याचे नमुने विद्यापीठाकडे पाठवले होते. पुणे येथील शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या नमुन्याची निवड झाली. पुतळ्याचे काम योग्य कलात्मक पद्धतीने व्हावे, यासाठी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी पुण्यातील मिलिटरी स्कूलमध्ये घोडा आणि स्वार यांच्याकडून प्रात्यक्षिके करून घोड्याची मान, स्नायू, लगाम कसे दिसतात हे शिल्पकार खेडकर यांना प्रत्यक्षात दाखविले. तसेच त्यांनी शिवरायांची भावमुद्रा, आभूषणे, पोशाख आदी विषयीही सूचना केल्या.

या पुतळ्याचे काम सन १९७१ मध्ये सुरू झाले. ते काम तीन वर्षांमध्ये पूर्ण झाले. पुतळ्याच्या चौथऱ्याचे काम कांचीपुरम येथील डॉ. अमरेंद्र कुमार यांनी केले. चौथऱ्यासाठी लागणारा गुलाबी ग्रॅनाईट दगड आंध्र प्रदेश, तामिळनाडू येथून आणण्यात आला. तामिळनाडूमधील कारागिरांनी दगडी काम केले. पुतळ्याच्या उभारणीसाठी भोगावती, दूधगंगा-वेदगंगा, कुंभी-कासारी, वारणा आणि पंचगंगा या सहकारी साखर कारखान्यांनी प्रत्येकी ६० हजार, तर विद्यापीठाचे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी आणि नागरिकांनी ६६ हजार ५९० अशी एकूण तीन लाख ६६ हजार ५९० इतकी आर्थिक मदत केली. या पुतळ्याचे अनावरण एक डिसेंबर १९७४ रोजी तत्कालीन परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. त्याला रविवारी (ता. १) ५० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त शनिवारी विद्यापीठात विविध उपक्रमांनी सुवर्णमहोत्सव सोहळा रंगणार आहे.

### असा आहे पुतळा

चौथऱ्यासह या पुतळ्याची एकूण उंची ३६ फूट ६ इंच इतकी आहे. त्यातील केवळ पुतळ्याची उंची १८ फूट ६ इंच, तर लांबी २० फूट आहे. या पुतळ्याचे वजन आठ टन इतके असून, त्याची संपूर्ण घडण ब्राँझमधील आहे.

27 NOV 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील शिवरायांच्या पुतळ्याचा सुवर्ण महोत्सव

## १ डिसेंबरला १९७४ ची उभारणी : अजूनही भक्कमपणे उभा

पोपट पवार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : घोड्यावर बसलेल्या युगपुरुषाने घोड्याचा लगाम ओढावा अन् त्याक्षणी घोडा थांबावा इतका तो देखणा पुतळा... हा रुबाबदार पुतळा पाहून गेल्या ५० वर्षांत रस्त्यावरून जाणाऱ्यांचे हात क्षणात जोडले नाहीत अशी व्यक्ती सापडणे दुर्मीळ...ऊन, वारा अन् पावसातही तो पुतळा पहाडासारखा उभा आहे, जणू सह्याद्रीच्या रक्षणासाठी या युगपुरुषाने घोड्याला टाप दिल्याचा भास व्हावा.

कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या प्रवेशद्वारात उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या उभारणीला येत्या १ डिसेंबरला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. पुण्यातील शिल्पकार बी.आर. खेडकर यांनी उभारलेल्या या पुतळ्याने विद्यापीठासह कोल्हापूर शहराच्या सौंदर्यात अन् अस्मितेतही मोलाची भर घातली आहे.

शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर ज्यांच्या नावे हे विद्यापीठ सुरू आहे त्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा विद्यापीठात असावा अशी भावना पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांची झाली. त्यातून त्यांनी १९७० मध्ये जाहिरात देऊन पुतळ्याचे मॉडेल्स मागविले. यात बी.आर. खेडकर यांचे मॉडेल्स त्यांना आवडले. त्यानुसार ते काम त्यांना देऊन पुतळा तयार करण्यास सुरुवात झाली.

शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यासाठी खेडकर यांनी अभ्यास केला. त्यासाठी त्यांनी काही पुतळे व घोड्यांचेही निरीक्षण केले. शिवरायांचा चेहरा, पोशाख, आभूषणे, लगाम खेचून उभा राहिलेला घोडा याचा अभ्यास करत खेडकर यांनी १९७१ मध्ये पुतळा तयार करण्यास सुरुवात केली. १८ फूट ६ इंच उंची व ८ टन वजनाचा हा पुतळा त्यांनी तीन-साडेतीन वर्षांत तयार केला. देशाचे परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण व मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते १ डिसेंबर १९७४ ला या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले.



शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या याच अश्वारूढ पुतळ्यास येत्या एक डिसेंबरला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. इतकी वर्षे ऊन, वारा, पाऊस सोसूनही तो आजही तितक्याच भक्कमपणे उभा आहे. (छाया : नसीर अत्तार)

### काटेकोरपणे देखभाल

या पुतळ्याची देखभाल विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागाकडून केली जाते. शिल्पकार बी. आर. खेडकर यांनी पुतळा उभारल्यानंतर देखभालीसाठी काही सूचना केल्या होत्या. याची झीज होऊ नये यासाठी त्यांनी दिलेल्या सूचनांचे अभियांत्रिकी विभागाकडून काटेकोरपणे पालन केले जाते. प्रत्येक महिन्याला पुतळ्याची स्वच्छता केली जाते.

### दृष्टिक्षेपात पुतळा

उंची १८ फूट ६ इंच
वजन : ८ टन
जमिनीपासून चबुतऱ्यापर्यंतची उंची : ३६ फूट ६ इंच
घोड्याची लांबी-२० फूट

शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा हे सगळ्यांचे ऊर्जास्थान आहे. शिल्पकार बी.आर. खेडकर यांनी तत्कालीन कुलगुरुंच्या मार्गदर्शनाखाली एका अप्रतिम पुतळ्याची निर्मिती केली आहे. हा पुतळा म्हणजे लाखो विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणास्रोत आहे. या पुतळ्याला ५० वर्षे पूर्ण होत आहेत याचा आम्हाला अभिमान आहे.

-डॉ.डी.टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 NOV 2024
पुढारी

# प्रसार माध्यमांनी स्वयंनियमन करावे

## शिवाजी विद्यापीठातील गोलमेज परिषदेतील सूर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लोकशाही मूल्ये टिकण्यासाठी प्रसारमाध्यमांचे अस्तित्व महत्त्वाचे आहे. भारतीय राज्यघटनेने माध्यमांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर कायदे करून सक्तीचे नियंत्रण आणणे योग्य नाही. यासाठी माध्यमांनी स्वतःच माध्यमांचे नियमन करावे, असा सूर 'भारतीय राज्यघटना आणि प्रसारमाध्यमे' या विषयावर आयोजित गोलमेज परिषदेत मान्यवर वक्त्यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठ मास कम्युनिकेशन अधिविभाग, जनसंपर्क कक्ष व कोल्हापूर प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने मास कम्युनिकेशन विभागात परिषद आयोजित करण्यात आली. अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, प्रसारमाध्यमांमध्ये समाजाचा सर्वांगीण विकास करण्याची क्षमता आहे. सरकारला संवेदनशील बनविण्याचे काम माध्यमे करू शकतात. धोरणांची निर्मिती आणि त्याच्या अंमलबजावणीत माध्यमांची भूमिका विशेष महत्त्वाची ठरते.

ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, ज्येष्ठ पत्रकार चारुदत्त जोशी, कृष्णात जमदाडे, ज्येष्ठ पत्रकार उदय कुलकर्णी, समीर मुजावर, डॉ. चंद्रकांत लंगरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, अविनाश भाले, प्रशांत आयरेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी कोल्हापूर प्रेस क्लबतर्फे तयार केलेल्या संविधानाच्या उद्देशिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे यांनी आभार मानले. यावेळी हिंदी विभागाचे डॉ. प्रशांत मुंज, प्रशांत चुयेकर, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, अनुप जत्राटकर आदी उपस्थित होते.

27 NOV 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जीवनाच्या प्रत्येक पैलूशी संविधान संलग्न

## –डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतीयांच्या जीवनाच्या प्रत्येक पैलूशी भारतीय संविधान निगडित आहे. याची जाणीव असणारे प्रगल्भ लोकच प्रगल्भ लोकशाही साकार करतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले.

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान अमृतमहोत्सव सप्ताहाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. मानव्यशास्त्र सभागृहातील कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ. महाजन म्हणाले, भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया प्रत्येक भारतीय नागरिकाने समजावून घेणे आणि त्याविषयी सर्वसामान्यांत जागृती करणे आवश्यक आहे. देश म्हणून आपण काय करणार आहोत, हे संविधानाची प्रास्ताविका सांगते, म्हणून तिला उद्देशिका म्हणतात. संविधान हे काही बाबतीत ताठर तर काही बाबतींत लवचिक आहे. हे संतुलन संविधानाचे सौंदर्य आहे. संविधानात लोककल्याणकारी राज्याची संकल्पना अभिप्रेत आहे. त्या दृष्टीने नागरिकांना मूलभूत हक्क प्रदान करण्यात आले आहेत. त्याच बरोबरीने संविधानात नागरिकांसाठी काही मूलभूत कर्तव्येही सांगण्यात आली आहेत. आपल्या हक्कांचे संवैधानिक संरक्षण व्हावयाचे असेल, तर कर्तव्यपालनही आवश्यक ठरते. संविधानातील मार्गदर्शक तत्त्वेही भारतीय समाजात सामाजिक–आर्थिक समता आणि न्याय प्रस्थापनेच्या कामी महत्त्वाची भूमिका बजावतात.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, भारतीय नागरिकांनी संविधान समजून घेण्यास प्राधान्य द्यायला हवे. संविधान हा भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे. प्रत्येक भारतीय नागरिकाने आपल्या जीवनामध्ये संविधानाचा स्पर्श कधी–कधी आणि कुठे–कुठे झाला आहे, याचे आत्मचिंतन केल्यास आपण घेत असलेला मोकळा श्वास ही सुद्धा संविधानाची देणगी आहे. सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी संविधानाधारित विशेष परीक्षा घेण्यात येईल. प्रास्ताविक डॉ. तानाजी चौगुले यांनी केले. सूत्रसंचालन अविनाश माले यांनी केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. किशोर खिलारे आदी उपस्थित होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संविधान अमृतमहोत्सव सप्ताहाच्या उद्घाटन समारंभात मार्गदर्शन करताना डॉ. श्रीकृष्ण महाजन. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. तानाजी चौगुले.**

27 NOV 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधानाची निर्मिती प्रक्रिया समजावून घ्या

## डॉ. महाजन : विद्यापीठात संविधान अमृतमहोत्सव सप्ताहाचा प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २६ : 'भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया प्रत्येक भारतीय नागरिकाने समजावून घेणे आणि त्याविषयी जागृती करणे आवश्यक आहे. भारतीयांच्या जीवनाच्या प्रत्येक पैलूशी संविधान निगडित असून, याची जाणीव असणारे प्रगल्भ लोकच प्रगल्भ लोकशाही साकार करतील,' असा विश्वास शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी आज येथे व्यक्त केला.

भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित संविधान अमृतमहोत्सव सप्ताहाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहात केले. त्यावेळी डॉ. महाजन बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'भारतीय नागरिकांनी संविधान समजून घेण्यास प्राधान्य द्यायला हवे. संविधान अमृतमहोत्सवानिमित्त विद्यापीठातर्फे सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी संविधानाधारित विशेष परीक्षा घेण्यात येईल. 'शिव-वाणी' कम्युनिटी रेडिओवरून संविधानाची माहिती देणारी दैनंदिन मालिका वर्षभर प्रसारित करण्यात येईल.' अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठात संविधान अमृतमहोत्सव सप्ताहाच्या उद्‌घाटन समारंभात मार्गदर्शन करताना अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन. यावेळी डावीकडून कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. तानाजी चौगुले उपस्थित होते.

### श्रीरंजन आवटे यांचे आज व्याख्यान

या सप्ताहामध्ये उद्या, बुधवारी सकाळी अकरा वाजता पुणे येथील डॉ. श्रीरंजन आवटे यांचे 'भारतीय संविधान आणि विकसित भारत' या विषयावर व्याख्यान होईल. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांच्या 'भारतीय संविधानिक मूल्ये आणि शिक्षण' या विषयावरील पोस्टर प्रदर्शनाचे उद्‌घाटन होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 NOV 2024
लोकमत

# विद्यार्थ्यांनी दाखविली संविधानाची दुर्मीळ प्रत

## शिवाजी विद्यापीठात उद्देशिका वाचन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी संविधान दिनानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. शहीद दिनानिमित्त शहिदांच्या पवित्र स्मृतींना अभिवादनही केले. विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयामधील संविधानाची मूळ प्रत सर्वांच्या अवलोकनार्थ प्रदर्शित करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह विद्यार्थ्यांनी या दुर्मीळ प्रतीची आणि त्यामधील संविधान सभा सदस्यांच्या स्वाक्षरीची पाहणी केली.

डॉ. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत संविधानाच्या अमृतमहोत्सवानिमित्त उद्देशिकेस अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मुख्य प्रशासकीय भवनामधील उद्यानात प्रस्थापित करण्यात आलेल्या संविधान उद्देशिका कोनशिलेसमोर एकत्र येऊन सर्वांनी तिचे सामूहिक वाचन केले.

यावेळी "२६/११" या दिवशी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले हेमंत करकरे, अशोक कामटे, तुकाराम ओंबाळे, मेजर संदीप उन्नीकृष्णन, शशांक शिंदे यांच्यासह इतर ज्ञात आणि अज्ञातांच्या स्मृतिचिन्हांना पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले.

यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख उपस्थित होते. दरम्यान, संविधानाच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने आयोजित केलेल्या संविधान अमृतमहोत्सव सप्ताहाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले.

27 NOV 2024 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Constitution Day celebrated in Kolhapur

TIMES NEWS NETWORK



TOI

A mass reading of the Preamble of the Constitution was held at SUK

**Kolhapur:** Samvidhan Divas or Constitution Day was celebrated with great enthusiasm in Kolhapur city on Nov 26.

Newly elected MLA Amal Mahadik on Tuesday, during the mass reading of the Preamble of the 'Constitution of India' at Bindu Chowk, said: "It is necessary to preserve the sanctity of the Indian Constitution, which the Constitution makers painstakingly created to build the country. For this, it is necessary to practise the values of the Constitution. Freedom, equality, fraternity, national unity and integration, secularism, socialism, democracy, republic, etc., are included in the Preamble of the Constitution and should be adopted by all the citizens."

District collector Amol Yedge and MLA Amal Mahadik flagged off a Samvidhan rally on Tuesday morning. The rally passed through Bindu Chowk, Chhatrapati Shivaji Maharaj Chowk, KMC Chowk, Gangaram Kamble Smarak, and CPR Chowk and concluded at Dasara Chowk. On behalf of the Dighe Foundation, the book of the Constitution was distributed among school students.

**Events at SUK**

Shivaji University, Kolhapur, has decided to celebrate Samvidhan Saptah (Constitution week), and various educational programmes have been organised. On Tuesday, a mass reading of the Preamble of the Constitution was held at SUK.

SUK Vice-Chancellor Dr D T Shirke, pro-Vice-Chancellor Pramod Patil, and other authorities gathered in front of the cornerstone of the Constitution, which was established in the garden of the main administrative building, and read it collectively. Similarly, on Tuesday, on the occasion of Martyrs' Day, people paid tribute to the martyrs.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 NOV 2024
सकाळ

# विद्यापीठात शहिदांच्या स्मृतींना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवारी अमृतमहोत्सवी संविधान दिनानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. त्याचप्रमाणे शहीद दिनानिमित्त शहिदांच्या पवित्र स्मृतींना अभिवादनही करण्यात आले. सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत संविधानाच्या अमृतमहोत्सवानिमित्त उद्देशिकेस अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मुख्य प्रशासकीय भवनातील उद्यानात प्रस्थापित केलेल्या संविधान उद्देशिका कोनशिलेसमोर जमून सर्वांनी तिचे सामूहिक वाचन केले. यावेळी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयामधील संविधानाची मूळ प्रत सर्वांच्या अवलोकनार्थ प्रदर्शित करण्यात आली. यावेळी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये शहीद झालेले हेमंत करकरे, अशोक कामटे, तुकाराम ओंबाळे, मेजर संदीप उन्नीकृष्णन, शशांक शिंदे यांच्यासह इतर ज्ञात-अज्ञात शहीद सैनिकांच्या स्मृतिचिन्हांना पुष्प वाहून सर्वांनी त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन केले.

27 NOV 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बी. ए., बी. कॉम.सह अन्य परीक्षांना प्रारंभ

## रविवारच्या परीक्षा पुढे ढकलल्या

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. आदी विद्यार्थी संख्या अधिक असलेल्या पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षांना आजपासून प्रारंभ झाला.

यंदा हिवाळी सत्रातील परीक्षा विद्यापीठाने ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये घेण्याचे नियोजन केले होते. मात्र, अभ्यासक्रम अपूर्ण असल्याने विद्यापीठाने या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. कमी विद्यार्थी संख्या असलेल्या परीक्षा बारा तारखेपासून, तर अधिक विद्यार्थी संख्या असलेल्या परीक्षा विधानसभा निवडणुकीचे कामकाज संपल्यानंतर २६ तारखेपासून घेण्याचे नियोजन केले. त्यानुसार आजपासून बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., बीबीए., बीसीए., बी. व्होक, बी.ई., बी. टेक., बी. टेक. आदी विविध २३१ विषयांच्या परीक्षा कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील विविध १८९ केंद्रांवर घेण्यात आल्या. दिवसभर विविध सत्रांत ८६ हजार ६९१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या परीक्षेमधील गैरप्रकार टाळण्यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने भरारी पथके कार्यरत ठेवली होती.

दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा एक डिसेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे यादिवशी होणाऱ्या परीक्षांच्या तारखेत बदल करण्यात आला आहे. त्यात स्किल इन्वेसमेंट कोर्स, ओपन इलेक्टिव्ह या विषयांच्या परीक्षांचा समावेश आहे. यातील स्किल इन्वेसमेंट अभ्यासक्रम सत्र एक आणि सत्र दोनची परीक्षा आठ डिसेंबर रोजी, तर ओपन इलेक्टिव्ह अभ्यासक्रम सत्र एकची परीक्षा १५ डिसेंबर रोजी होणार आहे.

### प्रथम वर्षाचे मूल्यमापन महाविद्यालय करणार

■ या हिवाळी सत्रापासून पदवीच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या परीक्षा विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून घेतल्या जाणार आहेत. त्यातील प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या परीक्षांच्या मूल्यमापनाची जबाबदारी महाविद्यालयांवर असणार आहे. उन्हाळी सत्रात प्रथम, द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांनी घेतल्या होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 NOV 2024
तरूण भारत

# एक डिसेंबरचे पेपर स्पर्धा परीक्षेमुळे पुढे ढकलले

■ शिवाजी विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२४ पदवी व पदव्युत्तर परीक्षेचे वेळापत्रक गेल्या महिनाभरापुर्वी जाहीर केले होते. परंतू अचानक महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणारी राजपत्रित नागरी सेवा पुर्वपरीक्षा १ डिसेंबर रोजी असल्याने शिवाजी विद्यापीठ अंतर्गत होणारा १ डिसेंबरचे पेपर पुढे ढकलण्यात आले आहेत, अशी माहिती परिपत्रकाव्दारे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत १ डिसेंबर रोजी होणारा स्किल एनहँसमेंट कोर्स पदवी प्रथम सत्राचा पेपर ८ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० ते १२ या वेळेत होणार आहे. तर व्दितीय सत्राचा पेपर दुपारी २.३० ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे. तसेच ओपन इलेक्टिव्ह पदवी अभ्यासक्रम प्रथम सत्राचा १ डिसेंबर रोजी होणारा पेपर १५ डिसेंबर रोजी दुपारी २.३० ते ४ या वेळेत होणार आहे. स्पर्धा परीक्षेमुळे हे पेपर पुढे ढकलण्यात आले आहेत. या परीक्षेसंदर्भातील माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उलब्ध आहे, तरी विद्यार्थी महाविद्यालयांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 NOV 2024

लोकमत

# एमपीएससी परीक्षेमुळे विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये बदल

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात येणारी राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा १ डिसेंबरला असल्याने शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला. १ डिसेंबरला होणारी पदवी अभ्यासक्रम एक व दोनची कौशल्य अभ्यासक्रम परीक्षा ८ डिसेंबरला होणार आहे. दरम्यान, हिवाळी सत्रातील बी ए, बी. कॉम, बी. एससी, बीबीए, बीसीए, बी. व्होक, बीई, बी. टेक यांसह २३१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा मंगळवारपासून सुरू झाल्या. यासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ८६६९१ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेमधील गैरप्रकार टाळण्यासाठी भरारी पथके कार्यरत होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 NOV 2024
तरुण भारत



# विद्यापीठ परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ पदवी व पदव्युत्तर परीक्षेला मंगळवारपासून प्रारंभ झाला. मंगळवारी २३१ विषयांची १८९ केंद्रावर परीक्षा झाली आहे. ८६ हजार ६९१ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. या परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी भरारी पथकांची नियुक्ती केली आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात एकही गैरप्रकार सापडला नाही, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

- **विद्यापीठाची स्वनिर्मित एसआरपीडी यशस्वी**

शिवाजी विद्यापीठाने स्वत: तयार केलेल्या सिक्युअर रिमोट पेपर डिलीवरी एसआरपीडीच्या माध्यमातून मंगळवारी पदवी व पदव्युत्तर परीक्षांच्या प्रश्नपत्रिका पाटवण्यात आल्या होत्या. सर्वच परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका वेळेत मिळाल्या आहेत. तसेच विद्यापीठाने केलेला पहिला प्रयोग यशस्वी झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. यापुढे सर्वच परीक्षांच्या प्रश्नपत्रिका विद्यापीठाच्या स्वनिर्मित एसआरपीडीच्या माध्यमातून पाठवल्या जाणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 NOV 2024
पुढारी

# १ डिसेंबरच्या परीक्षा वेळापत्रकात बदल

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या पार्श्वभूमीवर १ डिसेंबर रोजी होणाऱ्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा वेळापत्रकात बदल केला आहे.

१ डिसेंबर रोजी काही विषयाच्या परीक्षा होत्या. परंतु त्याचदिवशी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यामुळे या परीक्षेच्या तारखांमध्ये बदल केला आहे. त्यानुसार पदवी अभ्यासक्रम सत्र-१ (स्कील इनहांसमेंट कोर्सेस) परीक्षा ८ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० ते १२ यावेळेत, पदवी अभ्यासक्रम सत्र-२ (स्कील इनहांसमेंट कोर्सेस) परीक्षा ८ डिसेंबरला दुपारी २ ते ४ यावेळेत, तर पदवी अभ्यासक्रम सत्र-१ (ओपन इलेक्टिव्ह) परीक्षा १५ डिसेंबर रोजी दुपारी २.३० ते ४ याकालावधीत होणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

27 NOV 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विज्ञान-तंत्रज्ञान

# क्ष-किरण आणि एआय!

डॉ. व्ही.एन. शिंदे

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात एक संशोधक आपल्या प्रयोगशाळेत रात्री उशिरापर्यंत काम करत होता. नुकत्याच शोधल्या गेलेल्या कॅथोड किरणांवर त्यांचे संशोधन सुरू होते. त्यांनी सर्वोत्तम उपकरणे जमवली होती. काही उपकरणे त्यांनी स्वतः विकसित केली होती. उशिरापर्यंत प्रयोग करायचे, नंतर रात्रीचे जेवण करून पुन्हा प्रयोगशाळेत प्रयोग करत बसायचे, ते अगदी प्रयोग संपेपर्यंत. ८ नोव्हेंबर १८९५ चा तो दिवस होता. कॅथोड किरणांवरील प्रयोगासाठी सर्व प्रयोगशाळा तयार होती. कॅथोड किरण सुस्पष्ट दिसावेत, यासाठी पुढे स्फुरदीप्त (फ्लुरोसंट) पदार्थांचा थर असणारा पडदा ठेवला होता. कॅथोड किरण नलिकेत तयार होणारे किरण त्या पडद्यावर सुस्पष्ट दिसत होते.

कॅथोड किरणांच्या मार्गात कागदी पुठ्ठा, लाकडाची फळी, धातूचे पत्रे, शिशाच्या चकतीचा अडथळा धरून हे प्रयोग सुरू होते. त्यांना जास्त क्षमतेचे कॅथोड किरण तयार करायचे होते. त्यासाठी त्यांचा हा प्राथमिक अभ्यास मनोभावे सुरू होता. सर्व तयारीनिशी प्रयोग सुरू केला. त्यांना अपेक्षित असणारे परिणाम मिळाले. ते आता यशाच्या अगदी जवळ पोहोचले असे त्यांना वाटत होते. जेवल्यानंतर पुढील प्रयोग करण्याचे त्यांनी ठरवले. त्यासाठी उपकरणे बंद करू लागले. त्यावेळी त्यांना कॅथोड किरण तयार करणाऱ्या नलिकेपासून मीटरभर दूर असणाऱ्या पडद्यावर अंधुकसा प्रकाश दिसला. कॅथोड किरण इतक्या दूर जाऊ शकत नव्हते, मग हे काय? असा प्रश्न त्यांच्या मनात आला. त्यामुळे त्यांनी पुन्हा उपकरणे सुरू केली. मात्र, त्यांना तो प्रकाश कोठून येतो हे समजत नव्हते. कार्डपेटी पेटवून ते प्रकाश कोठून येतो याचा शोध घेण्याचा प्रयत्न करू लागले. प्रकाश कोठून येतो, याचा शोध घ्यायला दुसरे प्रकाशाचे साधन वापरणे ही गोष्ट तशी वेडेपणाची. मात्र, संशोधक असे अनेक वेडेपणाचे प्रयोग करत असतात.

अखेर त्यांना प्रकाश कोठून येतो हे सापडले. परत सर्व उपकरणे बंद करून जेवणासाठी गेले. दररोज पत्नीशी मनमुराद गप्पा मारणारा हा संशोधक त्या दिवशी गप्प होता. ते कसेबसे जेवले. तसेच पुन्हा प्रयोगशाळेत गेले आणि प्रयोग सुरू केला.

प्रकाशाचा उगम आणि पडदा यामध्ये वेगवेगळ्या पदार्थांचे अडथळे निर्माण करताना त्यांना पडद्यावर त्यांच्या हाताच्या बोटांची प्रतिमा अचानक दिसली. त्यांच्या तोंडून केवळ 'अशक्य' हा शब्द बाहेर पडला. हाडाची प्रतिमा कशी असू शकेल, काही भास असेल असा ते विचार करत होते. त्यांनी पुन्हा प्रयोग केला आणि त्यांच्या हाताच्या हाडांची सुस्पष्ट प्रतिमा दिसली. कॅथोड किरणांचा हा गुणधर्म नव्हता. म्हणजे कोणते तरी अज्ञात किरण बाहेर पडत होते. कोणते किरण हे माहीत नव्हते. त्या घटकेपर्यंत ते कोणाला ओळखताही आले नव्हते. ते अज्ञात होते, म्हणून त्यांनी त्या किरणांना एक्स-रे म्हणजेच क्ष-किरण हे नाव दिले. त्यानंतर त्यांनी त्या किरणांचे सर्व गुणधर्म तपासण्यास सुरुवात केली. दरम्यान, ख्रिसमस आला. मात्र, यांचे गुणधर्म अभ्यासण्याचे कार्य सुरूच होते. शेवटी वैतागून पत्नी बर्थाच प्रयोगशाळेत गेली आणि नवऱ्याच्या प्रयोगाने, त्या शोधाने वेडावून गेली. तिने अंगठी घातलेला हात त्या किरणांच्या मार्गात धरला आणि तिच्याही हातातील हाडांचे छायाचित्र निघाले. २७ डिसेंबर १८९५ चा तो दिवस होता.



पत्नीच्या हाताच्या हाडांची सुस्पष्ट प्रतिमा पहाताना विल्यम रॉंटजेन.

त्याने स्वतःच्या आणि पत्नीच्या हाताच्या हाडांच्या छायाचित्राच्या अनेक प्रती काढल्या. त्या अनेक नामवंत संशोधकांना पाठवल्या. हे नवे किरण शोधल्यानंतर त्याने आपल्या पत्नीला सांगितले की, 'आता सर्व दुःखे दूर होतील' आणि त्या संशोधकाचे म्हणणे अगदी खरे ठरले. हे क्ष-किरण शोधणारा संशोधक म्हणजे विल्यम रॉंटजेन. त्यांच्या या क्ष-किरणाच्या शोधावर सुरुवातीला अनेक संशोधक विश्वास ठेवण्यास तयार नव्हते. मात्र, काही संशोधकांनी असे किरण मिळवण्यात यश मिळवले. या शोधाची बातमी सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली. या किरणांचा उपयोग अस्थिव्यंगावरील उपचारासाठी करता येणे शक्य झाले.

अर्थात, कॅथोड नलिकेतून असे वेगळे किरण निघत असल्याचे इतरही काही संशोधकांच्या लक्षात आले होते. क्रुकस यांच्या छायाचित्रण प्लेटस अज्ञात किरणांनी खराब झाल्याचे १८८० साली दिसून आले होते. १८८८ आणि १८९३ मध्ये लिनार्ड हे ही अशा अज्ञात किरणांचा शोध घेत होते. पुढे त्यांचे मार्गदर्शक हेन्रिच हर्टझ यांचे निधन झाल्याने त्यांनी या विषयावरील संशोधन थांबवले होते. पेनसिल्वानिया विद्यापीठातील संशोधक गुडस्पीड यांच्याही लक्षात असे किरण आले होते. मात्र, त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आणि अवघ्या तीन वर्षांत रॉंटजेन यांना या शोधासाठी नोबेल मिळाल्यानंतर आपण किती मोठी चूक केली, हे त्यांच्या लक्षात आले.

युद्धामध्ये गोळी लागून जखमी झालेले सैनिक, अपघातात हाडांना झालेल्या इजा आणि शरीरातील घुसलेल्या गोळ्या किंवा अन्य घन पदार्थांचे स्थान शोधण्यासाठी क्ष-किरणांचा वापर सुरू झाला. वैद्यक क्षेत्रातील या किरणांच्या वापरामुळे अमूलाग्र बदल झाले. अस्थिरोग आणि अपघातातील हाडांना झालेल्या इजा, संधिवातून हाड निखळणे याचे नेमके निदान आणि उपचार करणे सुलभ झाले. त्यामुळे लोकांच्या वेदना कमी झाल्या. रॉंटजेन यांचा या शोधाचा मानव कल्याणासाठी होत असलेला उपयोग समाधान देणारा होता. या शोधाने अस्थिरोगतज्ज्ञांचे कार्य खूपच सोपे केले होते.

आज रॉंटजेन आणि क्ष-किरणांची आठवण येण्याचे कारण म्हणजे आता अस्थिरोगावरील उपचारामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुरू करण्यात येणार आहे. मानवाच्या शरीराच्या रचनेची संपूर्ण माहिती कृत्रिम बुद्धिमत्तेला पुरवण्यात आल्यानंतर रुग्णाचे क्ष-किरण प्रतिमे यंत्राकडे सोपवण्यात येईल. एआय तंत्रज्ञान मानवाच्या त्या भागाच्या रचनेमध्ये कोणता बिघाड झाला आहे हे शोधून काढेल. अस्थिरोग रुग्णाचे क्ष-किरण छायाचित्र डोळ्यासमोर धरून रोग शोधत आहेत, हे चित्र यापुढे दिसणार नाही. डॉक्टर निदान करणार नाहीत, ते राहतील उपचारापुरते. दैनंदिन जीवनात या तंत्रज्ञानाचे जसे अतिक्रमण वाढत जाईल तसे आपण त्याला बळी पडत जाऊ आणि हे तंत्रज्ञानच आपला घात करेल, असे या तंत्रज्ञानाचे जनक, नोबेल पुरस्कार प्राप्त संशोधक सांगत आहेत, त्याकडे दुर्लक्ष व्हायला नको!

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९९७३७८४४००